बीड |जालना| छत्रपती संभाजीनगर | पुणे | अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → मंगळवार दि १४ जुलै२०२६ → वर्ष १० वे → अंक -११ → पाने ४ → किंमत २ रु
Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Tuesday Date: 14 July 2026 → 10 th Year → 04 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
संपादक - भारत गायकवाड

# बीड नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा तहकूब

**बीड नगरपरिषदेची आज आयोजित करण्यात आलेली सर्वसाधारण सभा प्रचंड गोंधळ आणि विरोधकांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे अखेर तहकूब करण्यात आली आहे. नगरपरिषद प्रशासनाकडून पूर्वी मंजूर झालेले ठराव, सध्या शहरात सुरू असलेले विकासकामं आणि निविदा याची कोणतीही स्पष्ट माहिती न दिल्याने भाजपसह रा.काँ. शरदचंद्र पवार पक्षाचे नगरसेवक आक्रमक झाले.**

## विरोधकांचा प्रशासनावर हल्लाबोल




**लोकनायक वृत्तसेवा –** बीडमध्ये सभा तहकूब झाल्यानंतर नगरपरिषद परिसरात सोमवारी (दि.१३) पत्रकारांशी बोलताना भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी प्रशासकीय कारभारावर ताशेरे ओढले. त्या म्हणल्या, आज बीड नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा तहकूब झाली आहे. याला कारणीभूत म्हणजे बीड नगरपालिकेचा सध्या सुरू असलेला गलथान आणि मनमानी कारभार आहे. जेव्हा स्थायी समिती किंवा सर्वसाध–ारण सभा घ्यायची असते, तेव्हा मागील बैठकीतील मंजूर ठरावांची आणि कामकाजाची सविस्तर माहिती प्रत्येक नगरसेवकापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. जोपर्यंत विकासकामांची संपूर्ण माहिती

### पारदर्शक विकासकामासाठी आम्ही एकत्र आलो : खुर्शीद आलम

मागील बैठकांमध्ये मंजूर झालेल्या सर्व ठरावांची अधिकृत माहिती नगरसेवकांना लेखी स्वरूपात मिळावी. सध्या शहरात कोणती कामे चालू आहेत आणि कोणती कामे पुढे टेंडरसाठी पाठवली आहेत, याचा संपूर्ण तपशील द्यावा. प्रशासनाने स्वतःच्या मनाने

### विरोधी पक्ष म्हणून आम्ही जाब विचारत राहू : डॉ.सारिकाताई क्षीरसागर

विरोधकांनी नगरपरिषद प्रशासनाविरोधात मोठी एकजुट दाखवली. डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासोबत रा.काँ. शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते खुर्शीद आलम आणि दोन्ही पक्षांचे सर्व नगरसेवक या लढ्यात एकत्र आले होते. बीडच्या नागरिकांवर पारदर्शकता नसलेले कोणतेही काम लादले जाऊ नये आणि प्रत्येक काम हे पूर्णपणे पारदर्शक राहिले पाहिजे, हाच या तहकुबीमागचा मुख्य उद्देश असल्याचे विरोधकांनी

समोर येत नाही, तोपर्यंत आम्ही कोणत्याही गोष्टीला मान्यता देणार नाही. जर प्रत्येक गोष्ट स्वतःच्याच मनाने 'मंजूर झाली' असं दाखवून कारभार करायचा असेल, तर यापुढे प्रत्येक बैठकीमध्ये विरोधकांकडून हाच निर्णय घेतला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## एसआयआर सर्वेक्षणात हलगर्जीपणा ; कर्मचारी गैर हजर - संतोष रासवे


**लोकनायक वृत्तसेवा**
माजलगाव - एसआयआर मतदान नोंदणी सर्वेक्षणासाठी तालुक्यातील खरात आडगाव येथे नियुक्त करण्यात आलेल्या काही कर्मचाऱ्यांवर कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचे गंभीर आरोप करत कर्मचारी प्रत्यक्ष क्षेत्रात सर्वेक्षण करण्याऐवजी केवळ सोशल मीडियावर संदेश फिरवून औपचारिकता पूर्ण करत असल्याचे पत्रकार संतोष रासवे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळिवले आहे.
पत्रकात म्हटले आहे की ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार अनेक भागांत नियुक्त कर्मचारी प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती संकलित करत नसल्यामुळे अनेक पात्र मतदारांची नोंदणी, दुरुस्ती किंवा पडताळणी योग्य प्रकारे होत नसल्याची तक्रार आहे. काही कर्मचारी नियुक्तीच्या ठिकाणी गैरहजर राहत असल्याचाही आरोप केला जात आहे. यामुळे सर्वेक्षणाच्या विश्वासार्हतेबाबत नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याने या पार्श्वभूमीवर संबंधित कर्मचाऱ्यांच्या मोबाईल कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) लोकेशनची तपासणी करण्यात यावी.
यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशीही अपेक्षा व्यक्त करुन नमुद केले आहे की,आरोपांबाबत संबंधित कर्मचारी किंवा प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.
त्यामुळे या पान २ वर

## एसआयआर सर्वेक्षणात हलगर्जीपणा ; कर्मचारी गैर हजर. -संतोष रासवे

**लोकनायक वृत्तसेवा**
माजलगाव - एसआयआर मतदान नोंदणी सर्वेक्षणासाठी तालुक्यातील खरात आडगाव येथे नियुक्त करण्यात आलेल्या काही कर्मचाऱ्यांवर कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचे गंभीर आरोप करत कर्मचारी प्रत्यक्ष क्षेत्रात सर्वेक्षण करण्याऐवजी केवळ सोशल मीडियावर संदेश फिरवून औपचारिकता पूर्ण करत असल्याचे पत्रकार संतोष रासवे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळिवले आहे.पत्रकात म्हटले आहे की ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार अनेक भागांत नियुक्त कर्मचारी प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती संकलित करत नसल्यामुळे अनेक पात्र मतदारांची नोंदणी, दुरुस्ती किंवा पडताळणी योग्य प्रकारे होत नसल्याची तक्रार आहे. काही कर्मचारी नियुक्तीच्या ठिकाणी गैरहजर राहत असल्याचाही आरोप केला जात आहे. यामुळे सर्वेक्षणाच्या विश्वासार्हतेबाबत नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याने या पार्श्वभूमीवर संबंधित कर्मचाऱ्यांच्या मोबाईल कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) लोकेशनची तपासणी करण्यात यावी.यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशीही अपेक्षा व्यक्त करुन नमुद केले आहे की,आरोपांबाबत संबंधित कर्मचारी किंवा प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.
त्यामुळे या प्रकरणाची अधिकृत चौकशी झाल्यानंतरच वस्तु-स्थिती स्पष्ट होईल.मात्र ग्रामस्थांकडून होत असलेल्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणणे आवश्यक असल्याचे मत संतोष रासवे यांनी प्रसिद्धी पत्रकात शेवटी म्हटले आहे.एसआयआर सर्वेक्षणात हलगर्जीपणा ; कर्मचारी गैर हजर. -संतोष रासवे. लोकनायक वृत्तसेवा*
माजलगाव - एसआयआर मतदान नोंदणी सर्वेक्षणासाठी तालुक्यातील खरात आडगाव येथे नियुक्त करण्यात आलेल्या काही कर्मचाऱ्यांवर कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचे गंभीर आरोप करत कर्मचारी प्रत्यक्ष क्षेत्रात सर्वेक्षण करण्याऐवजी केवळ सोशल मीडियावर संदेश फिरवून औपचारिकता पूर्ण करत असल्याचे पत्रकार संतोष रासवे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळिवले आहे.पत्रकात म्हटले आहे की ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार अनेक भागांत नियुक्त कर्मचारी प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती संकलित करत नसल्यामुळे अनेक पात्र मतदारांची नोंदणी, दुरुस्ती किंवा पडताळणी योग्य प्रकारे होत नसल्याची तक्रार आहे. काही कर्मचारी नियुक्तीच्या ठिकाणी पान २ वर

## बीएलओ ने जिवंत व्यक्तीला मृत दाखवून मतदार यादीतून वगळले नाव.!

**लोकनायक वृत्तसेवा**
माजलगाव -तालुक्यातील फुले पिंपळगाव येथील एका जिवंत व्यक्तीला मृत दाखवून त्यांचेनाव मतदार यादीतून वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे,प्रकरणी संबंधित बीए-लओ किरण माने यांच्यावर


प्रति, मा.राज्य निवडणूक आयुक्त साहेब, महाराष्ट्र राज्य, मुंबई. दि.10/07/2026

तात्काळ निलंबनाची व फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली कारवाई न झाल्यास १५ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त कार्यालय,मुंबई येथे अमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.
फुले पिंपळगाव,ता.माजलगाव येथील रहिम शेख चाँद शेख यांनी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्तांना सविस्तर निवेदन सादर केले आहे यात नमूद केले आहे की,त्यांचे नाव सन २००५ पासून मतदान यादीत असून ते सध्या जिवंत असतानाही संबंधित बीएलओने त्यांना 'मृत' पान २ वर

## शाळेच्या सेवकाचा संशयास्पद मृतदेह आढळला

**लोकनायक वृत्तसेवा –**
तालुक्यातील पट्टीवडगाव येथील युवकाच्या खुनाची घटना ताजी असतानाच, आज सोमवारी (दि.१३) पहाटे शहरातील तथागत चौकात एका ४१ वर्षीयसेवकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. हा मृत्यू नेमका कशामुळे झाला? हा घातपात आहे की अपघात? याबाबतचे गूढ वाढले असून पोलीस यंत्रणा तपास करीत आहे. विवेक करपे (वय ४१ वर्ष) रा. जवळबन (ता.केज )असे मयताचे नाव आहे. ते केज येथे पत्नी मुलाबाळांसह वास्तव्यास होते. वडवणी तालुक्यातील खडकी देवळा येथील एका खाजगी शाळेवर ते सेवक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, इयत्ता १०






वीत शिकणारा मुलगा आणि एक लहान मुलगी असा परिवार आहे. आज सोमवारी सकाळी तथागत चौकात विवेक करपे यांचा मृतदेह संशयास्पद अवस्-थेत नागरिकांच्या निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळता-चळेच्या सेवकाच पान २ वर

## हाजी शेख अहेमद बाबन यांचे वृद्धापकाळाने निधन

**लोकनायक वृत्तसेवा –**
जिल्हा रुग्णालयातील सेवानिवृत्त कर्मचारी हाजी शेख अहेमद बाबन यांचे दिनांक ११ जुलै २०२६ शनिवार रोजी रात्री ०८:०० वाजेच्या सुमारास वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची नमाज़ ए जनाज़ा बालेपीर दरगाह मस्जीद येथे पठण करण्यात आली. दफनविधी दरगाह कब्रस्तान येथे आज



दिनांक १२ जुलै २०२६ रविवार रोजी सकाळी ११:०० वाजता करण्यात आला. यावेळी जिल्हा रुग्णालयासह आरोग्य क्षेत्र आणि समाजाच्या विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होते. हाजी शेख अहेमद बाबन यांनी जिल्हा रुग्णालयात अनेक वर्षे मलम पट्टी विभागात सेवा केली. अत्यंत मनमिळावू आणि व्यवस्थित पान २ वर

## ऊसाच्या शेतात सापडला कुजलेला मृत देह ; पोलीस तपास सुरू

**लोकनायक वृत्तसेवा.**
माजलगाव-तालुक्यातील राजेगाव परिसरातील एका शेतकऱ्याच्या ऊसात रा.मालीपारगाव तांडा,ता.माजलगाव येथील पुरुषाचा कुजलेल्या अवस्-थेतील मृतदेह आढळून आला



पोलीसांनी मृत देहाची ओळख अधिकृतरीत्या पटविली असून तो इसम नामे कृष्णा गणपत राठोड (५३वर्षे अंदाजे)असुन मृत्यू नेमका कशामुळे झाला याचा तपास सुरू आहे.
कळालेल्या माहितीनुसार मृतदेह सुमारे तीन ते चार पान २ वर




**लोकनायक वृत्तसेवा –**
श्री संत आदिशक्ती मुक्ताबाई पालखी सोहळा २०२६ या दरम्यान वारकऱ्यांना साठी दैनंदिन उपयोगी वस्तूंचे किट व रेन कोट चे वाटप स्वराज्य नगर चा राजा मंडळा कडून करण्यात आले.राम कृष्ण हरी

## मच्छिंद्रनाथ गडाचा सर्वांगीण विकास वेगात; आमदार सुरेश धस व जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची विकासकामांची पाहणी

### भाविकांसाठी दर्जेदार सुविधा, भव्य मंदिर जीर्णोद्धार आणि गुणवत्तापूर्ण कामांवर भर

**लोकनायक वृत्तसेवा –**
श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे सुरू असलेल्या विकासकामांची सोमवारी (दि. १३ जुलै) आमदार सुरेश धस आणि बीडचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रत्यक्ष पाहणी करून मंदिर जीर्णोद्धार कामांचा आढावा घेतला. गडावरील भव्य मंदिराच्या जीर्णोद्धारासह विविध विकासकामांची भव्यदिव्य, प्रगती आणि सुसज्ज नियोजनाची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली.यावेळी पान २ वर




दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

प्रो.सागर गायकवाड मो.9860145412
सागर ग्लास हाऊस
आमच्याकडे सर्व प्रकारचे विन्डोज,डोअर,
ॲल्युमिनियम पार्टीशनची कामे केली जातील
तसेच लॅमिनेशन डोअर सनमाइक डोअर फायबर डोअर
सागवन डोअर योग्य भावत तयार करुण मिळतील.
पत्ता: श्री संत सावतामाळी चौक कृष्णमंदिर रोड बीड

loknayak 14.07.2026 Copy:Copy of Layout 1 7/14/2026 1:00 AM Page 3



# एकाच शिक्षकावर धामणगाव जिल्हा परिषद शाळेचा डोलारा

## आठ दिवसांत शिक्षक न दिल्यास शाळेला टाळे ठोकण्याचा इशारा

**लोकनायक वृत्तसेवा**

गोंडपिपरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या धामणगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मागील ऑक्टोबर महिन्यापासून केवळ एका शिक्षकावर संपूर्ण शाळेचा कारभार सुरू असल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन अतिरिक्त शिक्षकाची नियुक्ती करावी, अन्यथा आठ दिवसांच्या आत मागणी पूर्ण न झाल्यास शाळेला टाळे ठोकून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा धामणगावसीयांनी गटविकास अधिकारी, गोंडपिपरी यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.




धामणगाव येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतचे वर्ग असून सुमारे ५० विद्यार्थ्यांची पटसंख्या आहे. शासनाच्या निकषानुसार या पटसंख्येसाठी किमान दोन शिक्षकांची नियुक्ती आवश्यक असताना मागील शैक्षणिक सत्रापासून तसेच चालू सत्रातही केवळ नरेंद्र बट्टे हे एकमेव शिक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे पाचही वर्गांचे अध्यापन, शालेय प्रशासन, विविध शासकीय अहवाल, ऑनलाइन माहिती भरणे, सर्वेक्षण, बैठका व इतर कार्यालयीन जबाबदाऱ्या एकाच शिक्षकावर आल्याने विद्यार्थ्यांना नियमित व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे कठीण झाले आहे.

शिक्षकांना वारंवार शासकीय कार्यालयीन कामकाजासाठी बाहेर जावे लागत असल्याने अनेकदा विद्यार्थ्यांचे तास रिकामे राहतात. परिणामी विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमावर परिणाम होत असून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेलाही फटका बसत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असताना धामणगाव शाळेतील परिस्थिती मात्र त्याच्या पूर्णपणे विरुद्ध असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.पालकांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, मुलांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात घालणारी ही परिस्थिती अधिक काळ सहन केली जाणार नाही. त्यामुळे तातडीने आणखी एका शिक्षकाची नियुक्ती करून शाळेतील अध्यापन व्यवस्था सुरळीत करावी. अन्यथा आठ दिवसांनंतर ग्रामस्थ, पालक आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने शाळेला टाळे ठोकून तीव्र आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी शिक्षण विभागाच्या प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

**धामणगाव वांशियांच्या आलेल्या निवेदनावर सकारात्मक विचार करून गटशिक्षणाधिकारी यांच्याशी चर्चा करून लवकरच तोडगा काढण्याचा प्रयत्न करू**
**संजय नैताम**
**गटविकास अधिकारी गोंडपिपरी**

# त्या नगरसेवकांवरील जमीन विक्रीपत्राचा आरोप खोटा

**लोकनायक वृत्तसेवा**

शहरालगत असलेल्या सर्वे क्रमांक ३२९ मधील सामूहिक मालकीच्या शेतजमिनीच्या व्यवहारावरून गंभीर वाद निर्माण झाला होता.आणि जमीन विक्रीप्रकरणात गोंडपिपरी तालुक्यातील विद्यमान नगरसेवकांचा सहभाग असल्याचे आढळून आले.दरम्यान सदर जमिनीच्या खरेदी विक्री व्यवहारादरम्यान पाच हिस्सेदारांना डावलून विक्री करण्याचा आरोप नगरसेवकांवर केला होता. त्यात काही तथ्य नाही, ते सर्व चुकीचं आहे. तसेच शेरकी व इतर हिस्सेदाराने संपूर्ण व्यवहाराची स्वतंत्र व निष्पन्न चौकशी स्वतः करावी आणि सदर प्रकरणाचा सखोल अभ्यास करून बिनबुडाचे आरोप लावू नये असे नगरसेवक सचिन चिंतावर यांनी स्पष्ट केले. एवढेच नाही तर हिस्सेदारांनी पत्र परिषदेत दिलेल्या माहितीनुसार उर्वरित हिस्सेदारांच्या मालकी हक्काबाबत नगरसेवकांना कुठल्याही प्रकारची कल्पना नाही. आणि त्या हिस्सेदारासोबत नगरसेवकांनी कुठल्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार केलेला नाही. त्यामुळे अशा या बिन बुडाच्या खोट्या आरोपांमध्ये कुठल्याही प्रकारचे तत्त्य नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

# मुक्ताईच नाव का - तर

## धन्य झाली पायवाट

**लोकनायक वृत्तसेवा –**

गेली दोन वर्षे एक मंडळ नगर पालिकेकडे संत मुक्ताईच्या पावलाखालची जागा मुक्ताईच्या नावे करा अशी लेखी आर्जवे करत होत . काल संत महंत व लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थिती साक्षीने तो फेर ओढला गेला . आ विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वात पालिकेने महाराष्ट्राच्या वारकरी इतिहासात आपली नोंद केलीय .थोडं समजून घेणं गरजेचं आहे बीडच्या अनेक ओळखी आहेत आणि आम्ही त्या ओळखी जगाला दाखवत असतो .मग ज्या संत ज्ञानेश्वरांनी आम्हाला ज्ञानेश्वरी दिली .आम्हा मराठी मनाचे कल्याण करणारा उपकार ज्ञानशाने केला . त्या ज्ञानेश्वराला ताठी उघडायला लावणारा अधिकारी म्हणजे लहान बहीण मात्र अधिकाराने थोरल्या आदिशक्ती संत मुक्ताबाई . या भावन्डाचे आजोबा बिंदूसरेच्या काठावर स्थित समाधिस्त आहेत . १२५ वर्षे होत आहेत संत मुक्ताईची पालखी याच मार्गाने येते मग या मार्गाला संत मुक्ताई मार्ग नाव देणे सयुक्तिक आहे का नाही .काहींचे म्हणणे आहे कि हा मार्ग सुभाषचंद्र बोस नावाने आहे असेल देखील मात्र आम्ही स्वतःला कधी विचारले का कि आम्ही सुभाष रोड असा उल्लेख करताना बोस किंवा नेताजी शब्द वापरला ,नाही . नेताजी यांच्या बद्दल प्रचंड आदर देशभर त्यांची स्मारके आहेत त्यांचं येणं प्रस्तावित होत हेही मान्य मात्र ते आले नाहीत हे देखील वास्तव मात्र मुक्ताईची पावले १२५ वर्षापासून या मार्गावरून पंढरीची वारी करतात ना .

*आम्हा बहुजनांना ज्ञानी करण्याची शिक्षा भोगताना मुक्ताईने शिव्या खाल्ल्या ज्ञान पंडितांनी झोळीत शेण वाढले सामान्य जीवनातून बहिष्कृत केले .* सहा वर्षाची मुक्ताई असताना वडील विठल पंत व आई रुख्मिणी यांना इंद्रायणीत जिवंत समाधी घ्यायला लावली .त्या मुक्ताईचे आजोबा बीड शहरात आहेत हे आम्ही सांगायला नको .हे पहा वारकरी सांप्रदाय समतेचा संदेश देणारा आहे .मुक्ताई मार्ग हा आम्हा बीड करांचा आध्यत्मिक स्वाभीमान आहे . लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ही ओळख स्वतंत्र अबाधितच राहणार आहे .सुभाष चंद्र बोस यांच्या स्मृतीला कायम ठेवत संत मुक्ताई मार्ग ही ओळख आम्हाला पुढे न्यायची आहे

संत मुक्ताई मार्ग या प्रस्तावाच्या पाठीशी *नारायण गड - उत्तराधिकारी हभप संभाजी महाराज

सु भाष्य करणाऱ्या मुक्ताईचा मार्ग हा क्रांती निर्णय - महंत अमृतदासजी महाराज ह्व*

संत मुक्ताई मार्ग आदर्श नाव - महादेव महाराज चाकरवाडी

बीड ची ओळख सांप्रदायात वाढली - रामायणाचार्य नाना महाराज

लोकाभिमुख ज्ञानेशाची ओळख झाली -विवेक महाराज शास्त्री बीडकर मुक्ताईच्या मार्गाने दफ्तर घेतील - पिंगळा फेम खोले महाराज

मुक्ताई मार्ग सुवर्ण अक्षराने लिहले जाईल -दिंडी प्रमुख हारने बाबा

*माझ्या बालपणापासून हा पालखी मार्गआहे पालिकेने योग्य नाव दिले -आ विजयसिंह पंडित

आ विजयसिंह पंडित साहेबांचे कालचे सोहळ्यातील भाषण प्रगल्भ स्थिर ठाम आणि समतेला समर्पित होत . पूर्वनियोजित नसताना त्यांनी व्यक्त केलेल्या भावना सर्वांना सोबत घेण्याची भूमिका विस्तारित आणि लोकनेता म्हणून प्रभावित करणारी होती मुक्ताई मार्ग नाव दिले म्हणून देवाची आळंदीने बीडचे लेखी अभिनंदन केले आहे .बीडची प्रतिमा ओळख या निमित्ताने वाढली याचा आनंद आम्हाला सर्वांना असलाच पाहिजे .राजकारण समाजकारण चालत राहील मात्र संत ज्ञानेश्वर संत मुक्ताई संत निवृत्ती संत सोपान यांचे आजोबा बीड मध्ये आहेत हा दाखला आम्ही जगाला स्वाभिमानाने सांगितला पाहिजे .८०० वर्षांपूर्वी संत मुक्ताई होऊन गेली लिहिती झाली अहो पुरुषी ज्ञानाचा अहंकार

# ग्रामीण भागातून स्थलांतरामुळे मतदार पडताळणीपुढे आव्हान

**लोकनायक वृत्तसेवा –**

निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण (डखठ) मोहिमेदरम्यान ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणावरील स्थलांतरामुळे मतदार पडताळणीच्या कामात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. रोजगार, शिक्षण, व्यवसाय तसेच इतर कारणांमुळे अनेक नागरिक शहरांकडे किंवा इतर जिल्ह्यांत स्थलांतरित झाल्याने संबंधित मतदार प्रत्यक्ष घरी उपलब्ध नसल्याचे चित्र दिसून येत आहे. बूथ लेव्हल अधिकारी (इङज) आणि त्यांच्या सहाय्यकांकडून घरोघरी भेटी देऊन मतदारांची पडताळणी केली जात आहे. मात्र अनेक घरांना कुलूप असल्याने किंवा कुटुंबातील सदस्य बाहेरगावी असल्याने पडताळणीचे काम अपेक्षित वेगाने पूर्ण होत नाही. काम वेगाने पूर्ण करा अथवा कारवाई करू असा प्रशासनाचा सज्जड इशारा आणि दुसऱ्या बाजूला मतदारांची अनुपस्थिती यामध्ये कार्यरत शिक्षक व इतर कर्मचारी कात्रीत अडकले असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

बीड जिल्हा हा ऊस तोड मजुरांचा जिल्हा म्हणून ओळखला जात असून गळीत हंगाम संपल्यावर जिल्ह्यातील बहुसंख्य कामगार हे मिळेल त्या ठिकाणी रोजगाराच्या कामानिमित्त स्थलांतरीत होतात. ग्रामीण भागातील वाडी, वस्ती, तांड्यावरील शिक्षित मतदार देखील नौकरी, व्यवसाय किंवा पाल्याच्या शिक्षणासाठी स्थलांतरित झालेले आहेत.

निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण (डखठ) मोहिम राज्यात २९ जुलै पर्यन्त राबविण्यात येत असून या मोहिमेत नियुक्त बीएलओ आणि




त्यांचे सहाय्यक मतदारांच्या घरी जाऊन माहिती संकलन आणि अद्ययावतीकरण करत असताना ग्रामीण भागात घरात वयोवृद्ध माता-पिता अथवा कोणीच नसल्याचे चित्र दिसून येत आहे. उपस्थित कुटूंबियांकडे घरातील सदस्यांची शास्त्रोक्त माहितीकरिता पुरावे देखील मिळत नसल्याने या कामी नियुक्त कर्मचाऱ्यांची कसरत होत आहे.

ग्रामीण भागातील या विदारक परिस्थितीत काम करत असताना नियुक्त कर्मचाऱ्यांना वेळेवर काम पूर्ण करा अथवा कारवाई करण्यात येईल असा सज्जड दम ही प्रशासनाकडून वारंवार देण्यात येत असल्याने कर्मचाऱ्यांचे काम करून देखील मानसिक संतुलन बिघडत जात असल्याचे बोलले जात आहे.

निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार प्रत्येक पात्र मतदाराची अचूक नोंद सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष प्रयत्न केले जात असून स्थलांतरित मतदारांनी शक्य तितक्या लवकर आपल्या संबंधित इङज शी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत. मतदार यादी अचूक व अद्ययावत राहण्यासाठी मतदारांनी नियुक्त कर्मचारी आणि प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक बनले आहे.

# डोंगरेश्वर ते पंढरपूर दिंडीचं माध्यमिक विद्यालय जवळाला येथे महाराज व वारकऱ्यांचे फळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत

## संत भीमसिंह महाराज वारकरी शिक्षण संस्था व माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक विद्यार्थी स्वागताला

लोकनायक वृत्तसेवा –

अनेक वर्षापासून डोंगरेश्वर संस्थान देवधरा करंजवण येथून पांडुरंग महाराज कराड यांच्या मार्गदर्शनाखाली डोंगरेश्वर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात जातो. यामध्ये हजारो बांधव सहभागी होतात या पालखीचं आज जवळाला येथे मोठ्या उत्साहामध्ये संत भीमसिंह महाराज वारकरी शिक्षण संस्था व माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक, विद्यार्थी यांनी त्यांचं स्वागत केले. डोंगरेश्वर ते पंढरपूर पायी दिंडी दरवर्षी मोठ्या उत्साहामध्ये जाते यामध्ये हजारो बांधव सहभागी होतात. पंढरपूर पर्यंत जाताना हजारो ठिकाणी यांचे स्वागत व फळ देऊन केलं जातं त्याच पद्धतीने जवळाला येथील संत भीमसिंह महाराज वारकरी शिक्षण संस्था व माध्यमिक विद्यालय जवळाला येथील शिक्षक व विद्यार्थ्यांनी या दिंडीच जोरदार स्वागत केले कर यांना फळ तर महाराजांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले यावेळी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. कोठुळे एल.बी., राख बी.एस., कदम वाय.डी., पवार एस. एम., तोंडे डी.एन., सोनवणे यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते तर संत भीमसिंह महाराज वारकरी शिक्षण संस्था जवळाला येथील ह.भ.प. आप्पासाहेब महाराज कोठुळे यांच्यासह त्यांचे सर्व विद्यार्थी स्वागतासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते..



पुस्तकी ज्ञानाबरोबर अध्यात्माची जोड महत्त्वाची - मुख्याध्यापक कोठुळे

विद्यार्थी घडताना ज्ञान आणि संस्काराने परिपक्व असणं गरजेचं असतं म्हणूनच पुस्तकाच्या जोडीला अध्यात्म महत्त्वाच आहे. आमच्या शाळेतील विद्यार्थी दोन्हीही शिक्षण सोबत घेतात. विद्यार्थ्यांना ज्ञानाने सर्व गुण संपन्न व संस्काराने देखील मजबूत आणि वैचारिक बनवणं हे काम आम्ही अनेक वर्षापासून करत आलो आहोत, तेच भविष्यात करत राहू, त्यातीलच एक भाग म्हणजे येणाऱ्या दिंडीच स्वागत विद्यार्थी, आम्ही मोठ्या उत्साहात करतो आणि भविष्यातही करत राहू..

- श्री.कोठुळे एल. बी.

मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय जवळाला/करंजवण.

जवळाला गावातूनही भविष्यात मोठे कीर्तनकार घडवण्याचा संकल्प - ह.भ.प. आप्पासाहेब महाराज कोठुळे

अध्यात्माचं शिक्षण हे खूप महत्त्वाचा आहे. आपल्या जवळाला गावामध्ये अध्यात्माचं शिक्षण देण्याचं आणि अनेक वर्षापासून काम करत आहोत भविष्यकाळात इथूनच मोठे कीर्तनकार घडतील आणि घडवण्याचा माझा संकल्प आहे. अध्यात्म आणि शिक्षण याची जोड घेऊन आम्ही विद्यार्थी आणि संस्कारीक भविष्य घडवण्याचं काम करत आहोत.. भविष्यकाळात मोठा कीर्तनकार जवळाला गावातील दिसेल..

- ह.भ.प. आप्पासाहेब महाराज कोठुळे

संस्थापक संत भीमसिंह महाराज वारकरी शिक्षण संस्था जवळाला.

# लव्हुरीच्या श्री.बडेबाबा विद्यामंदिर शाळेचा घोळ कायम; आंदोलन सुरूच!

**लोकनायक वृत्तसेवा –**

केज तालुक्यातील लव्हुरी येथील श्री. बडेबाबा विद्यामंदिर या शाळेचा घोळ काही मिटायचे नाव घेत नसून यामुळे विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक होत आहे. शाळेच्या या कारभारामुळे मात्र विद्यार्थ्यांचे भवित्व अंधारात दिसत आहे. तर संस्थापक अध्यक्ष व सचिव हे रिक्त झालेल्या जागेवर शिक्षकांची नेमणूक करून घेत नसल्यामुळे पालक व ग्रामस्थांनी शाळेला टाळे ठोकून आंदोलन सुरू केले आहे.

परंतु प्रशासनाने व शाळेचे मुख्याध्यापक आणि संस्थापक अध्यक्ष व सचिव आणि शाळेचे मुख्याध्यापक यांनी अद्यापही आंदोलनाची दखल न घेतल्यामुळे बुधवार रोजी बीड जिल्हा परिषद मध्ये ग्रामस्थ व पालक हे विद्यार्थ्यांची शाळा भरवणार असल्याच्या इशारा प्रशासनाला प्रसार माध्यमांशी बोलताना पालक व ग्रामस्थांनी दिला आहे. शिक्षणाधिकारी यांनी श्री.बडेबाबा विद्यामंदिर या शाळेतील शिक्षकांच्या रिक्त झालेल्या जागेवर शिक्षकांची नियुक्ती केली आहे. व त्या शिक्षकांना श्री. बडेबाबा विद्या मंदिर येथे नियुक्त करण्याचे आदेश संस्थापक अध्यक्ष/सचिव यांना दिले असताना देखील संस्थापक अध्यक्ष व सचिव यांनी वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली असल्याचा आरोप पालक व ग्रामस्थांनी केला आहे.




याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दि. १६ /६/२०२५ रोजी पासून कार्यकारी अधिकारी, शिक्षण अधिकारी माध्यमिक विभाग बीड यांना पालक व ग्रामस्थ यांनी तेव्हापासून ते आज रोजी पर्यंत आम्ही वेळोवेळी संबंधित वरिष्ठ अधिकारी यांना १५ ते १६ वेळा पत्र दिले आहेत. व दिनांक १०नोव्हेंबर २०२५ रोजी सरपंच, पालक, ग्रामस्थ यांनी पाच दिवस शाळेसमोर आमरण उपोषण केले त्यावेळी शिक्षण अधिकारी माध्यमिक विभाग जि. प. बीड यांनी दिनांक१४ नोव्हेंबर २०२५ रोजी शिक्षकांच्या भरती करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने आम्ही उपोषण स्थगित केले. व आमच्या मागण्याप्रमाणे शिक्षक देण्यात आले परंतु सदरील शाळेत या शिक्षकांना नियुक्त केले करून घेतले नाही. संस्थाचालक व शाळेचे मुख्याध्यापक यांच्या आडमुठ्या भूमिकेमुळे व मनमानी कारभारामुळे अशा बेजबाबदार संस्थाचालक व मुख्याध्यापक यांच्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. दिनांक १५/६/२०२६ पासून शाळा सुरू झाल्या परंतु इयत्ता नववी व दहावी या वर्गाला गणित विषयाला शिक्षकच नसल्याने गणित विषयाची एकही तासिका झालेली नाही. याबाबत विद्यार्थ्यांनी व पालकांनी व गावचे सरपंच यांनी तक्रार केली असता सरपंच व पालक ग्रामस्थ यांनी मुख्याध्यापक यांच्यामार्फत संस्थेचे सचिव श्रीमती मंगलबाई संपतराव खांडेकर यांच्या सोबत दिनांक ८/ ७ /२०२६ रोजी श्री.बडेबाबा विद्यामंदिर या शाळेत बैठक घेण्यात आली होती. या बैठकीमध्ये सरपंच व पालक ग्रामस्थ यांनी सदर शाळेत रिक्त झालेल्या शिक्षकांची पदे भरण्याबाबत विनंती केली असता संस्थाचालक संस्थापक सचिव यांनी रिक्त झालेल्या शिक्षकांच्या जागा भरण्याबाबत स्पष्ट नकार दिला. व शाळा आहे त्या स्थितीमध्ये चालणार तुम्हाला आमच्या शाळेत विद्यार्थी ठेवायचे असतील तर ठेवा अन्यथा तुमच्या विद्यार्थ्यांचे टिसी घेऊन जा असे बेजबाबदारपणे सांगितले यावरून असे स्पष्ट होते की संस्थापक सचिव या

लोकनायक
मंगळवार दि १४ जुलै२०२६


# चला एकत्र येऊया हक्क मिळवूया

## घनसावंगीत जालना पत्रकार संरक्षण कृती समितीची धडाकेबाज बैठक संपन्न

**लोकनायक वृत्तसेवा –** पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे आणि हा स्तंभ मजबूत ठेवण्यासाठी पत्रकारांची व्यापक एकजूट ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे.

हाच बुलंद नारा देत पत्रकारांचे हक्क, त्यांचे संरक्षण आणि पत्रकारितेपुढील वाढत्या आव्हानांवर थेट आणि रोखठोक चर्चा करण्यासाठी जालना पत्रकार संरक्षण कृती समितीच्या वतीने शुक्रवार दि. १० जुलै २०२६ रोजी घनसावंगी येथे एका अत्यंत महत्त्वपूर्ण आणि वादळी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. येथील पंचायत समिती सभागृहात दुपारी ठीक २:०० वाजता संपन्न झालेल्या या बैठकीत जिल्ह्यातील मान्यवर संपादक आणि वरिष्ठ पत्रकारांनी उपस्थित राहून पत्रकार बांधवांना मार्गदर्शन केले आणि आपल्या न्याय्य हक्कांसाठी एकत्र येण्याचे जाहीर आवाहन केले.

केवळ भाषणे नाहीत तर थेट कृतीशील संवाद

सध्याच्या बदलत्या आणि आव्हानात्मक काळात पत्रकारांना दैनंदिन पातळीवर अनेक अडचणींचा आणि दडपणाचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकारांमध्ये केवळ संघटनात्मक बळकटी न आणता एक अभेद्य वज्रमूठ निर्माण व्हावी या मुख्य उद्देशाने या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ कोरडी भाषणे झाली नाहीत तर पत्रकारांच्या जिव्हाळ्याच्या आणि अस्तित्वाच्या विषयांवर थेट आक्रमक आणि कृतीशील संवाद साधण्यात आला.

बैठकीतील मुख्य धडाकेबाज मुद्दे आणि चर्चा हक्क आणि संरक्षणावर थेट मार्गदर्शन बदलत्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत पत्रकारांचे कायदेशीर आणि सामाजिक हक्क नेमके काय आहेत यावर उपस्थित संपादक कैलास फुलारी व वरिष्ठ संपादिका आयेशा खान मुलानी, संपादक संतोष भुतेकर तसेच पत्रकार शेख फारुक, बालाजी अडियाल, भगवान साबळे अत्यंत अभ्यासपूर्ण व रोकडठोक मार्गदर्शन केले. पत्रकार संरक्षण कायद्याचा प्रभावी वापर पत्रकारांवर होणारे भ्याड हल्ले आणि अन्यायाविरोधात पत्रकार संरक्षण कायद्याचा अस्त्र



म्हणून कसा प्रभावी वापर करावा याबाबत कायदेशीर बाजू सविस्तरपणे समजावून सांगण्यात आल्या. अन्याय सहन करायचा नाही आणि मागे हटायचे नाही असा निर्धार यावेळी व्यक्त झाला. ग्रामीण व शहरी समस्यांवर सांगोपांग चर्चा ग्रामीण व शहरी भागातील पत्रकारांना बातमीदारी करताना येणाऱ्या रोजच्या अडचणी प्रशासकीय उदासीनता आणि दबावाचे राजकारण यावर सर्वसमावेशक चर्चा करण्यात आली.

एकच ध्यास पत्रकारांचा विकास याच मुख्य ध्येयाने संघटना अधिक मजबूत करण्याचा आणि प्रत्येक पत्रकाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

मुक्त संवादाचे खुले व्यासपीठ: उपस्थित प्रत्येक पत्रकार बांधवाला आपले मत अनुभव आणि सूचना मांडण्यासाठी व्यासपीठ खुले करून देण्यात आले होते. अनेकांनी आपल्या भावनांना यावेळी वाट करून दिली.चला एकत्र येऊया हक्क मिळवूया पत्रकारिता सबळ करूया एकजूट हीच आपली शक्ती आहे हा संदेश तळागाळातील प्रत्येक प त्र क ा र ा प य ँ त पोहोचवण्यासाठी घनसावंगी शहर तालुका तसेच ग्रामीण भागातील सर्व पत्रकार बांधवांनी कोणत्याही मतभेदांशिवाय आणि भेदभावाविना या बैठकीला प्रचंड संख्येने उपस्थिती लावली होती. पत्रकारांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आता शांत बसायचे नाही तर सनदशीर मार्गाने आणि आक्रमकपणे लढा द्यायचा असा थेट इश–ाराच या बैठकीच्या माध्यमातून देण्यात आला आहे. या यशस्वी आणि धडाकेबाज आयोजनाबद्दल जालना पत्रकार संरक्षण कृती समितीचे सर्वत्र कौतुक होत असून या बैठकीने जिल्ह्यातील पत्रकारितेला एक नवी दिशा आणि ऊर्जा दिली आहे यात तीळमात्र शंका नाही. यावेळी बैठकी साठी घनसावंगी तालुक्यातील सुभाष बिडे, बाबासाहेब तेलगड, प्रल्हाद साळवे, नरेंद्र जोगड, मारोती सावंत,बाळासाहेब ढेरे, अशोक कंटुले, लक्ष्मीकांत कुलकर्णी, **पान २ वर**

# विद्यार्थी, युवकांच्या प्रश्नी परळीत जोरदार निदर्शने

**लोकनायक वृत्तसेवा –** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा पूर्ववत ऑफलाइन पद्धतीनेच घेण्यात याव्यात, सर्व शासकीय विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत व पेपर फुटी विरोधात कडक कार्यवाही करून भविष्यात पेपर फुटी होणार नाही याची काळजी घ्यावी, या मागण्यांना घेऊन सोमवार दि १३ रोजी भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ




(DYF$I) संघटनेच्या वतीने परळी मध्ये आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांनी सांगितले की, राज्य लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा जर ऑनलाईन पद्धतीने घेतली, तर त्याचा सर्वात मोठा फटका ग्रामीण भागातील **पान २ वर**

# आषाढी एकादशी निमित्त पाली येथे अखंड अन्नछत्राला पोलीस अधीक्षक नवनीत कावँत यांची सदिच्छा भेट

**लोकनायक वृत्तसेवा –** आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकरी व भाविकांसाठी पाली येथील श्री नागनाथ मंदिर परिसरात पाली ग्रामस्थ तसेच बीड शहर व जिल्हा व्यापारी महासंघ (कॅट) यांच्या संयुक्त विद्यमाने अखंड अन्नछत्र व प्रथमोपचार सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेला बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.





नवनीत कावँत यांनी सदिच्छा भेट देऊन उपक्रमाची पाहणी केली.यावेळी शिवाजीनगर पो–लीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री . बल्लाळ हे देखील उपस्थित होते. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावँत यांनी अन्नछत्र व प्रथमोपचार केंद्राच्या व्यवस्थेची माहिती घेत आयोजकांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी या सेवाभावी उपक्रमासाठी आयोजकांना शुभेच्छा दिल्या.आषाढी वारीदरम्यान हजारो वारकरी या मार्गावरून प्रवास करत असल्याने त्यांना मोफत भोजन, पिण्याचे पाणी तसेच प्रथमोप–चाराची सुविधा उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम भाविकांसाठी **पान २ वर**

# ९६६ कोटींच्या अहिल्यानगर-बीड राज्य मार्गाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात

## आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्याने सर्वेक्षणानंतर यंत्रणा मैदानात

**लोकनायक वृत्तसेवा –** प्रमुख राज्य मार्ग क्र. १६ अंतर्गत अहिल्यानगर ते बीड या ९६ किलोमीटर रस्त्याच्या सुधारणा प्रकल्पाला अखेर प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. राज्य शासनाने या महत्त्वाकांक्षी कामासाठी ९६६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्यानंतर आता नियुक्त कंपनीकडून प्रत्यक्ष कामाची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

आमदार सुरेश धस यांनी या रस्त्याच्या सुधारणेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानंतर राज्य शासनाने या कामास ९६६ कोटी रुपयांची मंजुरी दिली. आता 'रिअल स्ट्रेंथ



इन्फ्रास्ट्रक्चर, पुणे'(Real Strength Infra-structure, Pune) या 'रिअल स्ट्रेंथ इन्फ्रास्ट्रक्चर, पुणे' प्रत्यक्ष सर्वेक्षण पूर्ण करून कामाला प्रारंभ करण्यात आला आहे.या सर्वेक्षणावेळी संबंधित अधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समिती कडाचे माजी सभापती शत्रुघ्न मरकड यांच्यासह स्थानिक नागरीक उपस्थित होते. रस्त्यावरील धोकादायक वळणे, अरुंद भाग तसेच अपघातप्रवण **पान २ वर**

# भामाबाई पाखरे यांचे निधन

**लोकनायक वृत्तसेवा**

केज तालुक्यातील सोनीजवळा येथील भामाबाई बाबुराव पाखरे वय १०० वर्षे यांचे दिर्घ आजाराने दि.१२ जुलै २०२६ रविवार रोजी त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे,पतवंडे



असा मोठा परिवार आहे.

येथील ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळाच **पान २ वर**

# जेष्ठ समाजसेवक ऍड सोपानराव तांगडे यांचे निधन

**लोकनायक वृत्तसेवा –** सामाजिक,शैक्षणिक, कायदे क्षेत्रातील अभ्यासू,प्रामाणिक आणि जनतेसाठी आयुष्यभर झटणारे ज्येष्ठ समाजसेवक ॲड.सोपानराव कोंडिबा तांगडे यांचे दु:खद निधन



झाले.त्यांच्या निधनाने सामाजिक,शैक्षणिक आणि आंबेडकरी चळवळीची मोठी हानी झाली असून परिसरात शोककळा पसरली आहे.गजानन बँकेचे संचालक ऍड राजेश तांगडे **पान २ वर**



**लोकनायक वृत्तसेवा –आज नवगण राजूरी येथे नाला खोलीकरण व रुंदीकरण करून भराव टाकण्याच्या कामाचा शुभारंभ केला. गेल्यावर्षी मोठ्या प्रमाणात पुर आल्यामुळे याठिकाणी मोठी नुकसान झाली होती. यावर्षी संभाव्य मोठ्या पावसात ग्रामस्थांच्या सुरसुर–क्षेच्या दृष्टीने हे काम हाती घेण्यात आले आहे.**

# सेतू केंद्र चालकांचा सरकारला संतप्त सवाल!

**लोकनायक वृत्तसेवा –** विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेसाठी बीड विधानसभा मतदारसंघातील अनेक सेतू सुविधा केंद्र चालकांना मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे सहाय्यक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. मात्र या अतिरिक्त जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी शासनाकडून कोणतेही मानधन, प्रवास भत्ता किंवा इतर आर्थिक सुविधा जाहीर करण्यात आलेल्या नसल्याने सेतू केंद्र चालकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार सेतू केंद्र चालकांना मतदार पडताळणी, विशेष शिबिरांमध्ये उपस्थिती, कागदपत्रांची तप–ासणी, मतदार यादी अद्ययावत करण्यास मदत तसेच इतर निवडणूक विषयक जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. या सर्व कामांसाठी दिवसातील मोठा वेळ खर्च होत असल्याने त्यांच्या नियमित **पान २ वर**

## सुचना

दैनिक बीडचा **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल लोकनंायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.










This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com